# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/11/2022 (शुक्रवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यू

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०१ किमी. अंतरावर मौजा बुट्टीबोरी वेदार्या अपार्टमेंट येथे दिनांक १०/११/२०२२ चे २१.३० वा. २१.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— विनोद राजेश्वर पाठक, वय ४७ वर्ष, रा. डोंगरगाव टोलनाका पेट्रोलिंग इन्चार्ज हे पेट्रोलिंग करित असता यातिल आरोपी कार क्रं एमएच १४ ईएच ४२१० चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगयीने चालवुन पायदळ जात असलेल्या मृतक नामे—महेश रामकिशन बिश्वकर्मा, वय ४५ वर्ष, रा. एमपी यास धडक मारून गंभीर जखमी करून मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी कार चालकाविरुध्द कलम २७९ ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन बोरी करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील किल्लेकोलार नदी स्मशानघाट कडे जाणारा रोड येथे दिनांक ११/११/२०२२ चे ०७.३० वा. दरम्यान मृतक नामे— खुशाल रामाजी पाटील, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, खापरखेडा हा फिर्यादीचा साळा असुन मृतक हा दारु पिण्याच्या सवयीचा होता तसेच त्याचे नागपुर येथील एका मुलीसोबत प्रेम संबंध होते. त्या मुलीचे लग्न दुसऱ्या मुलासोबत जुळले होते त्यामुळे मृतक हा टेंशन मध्ये होता नमुद घटना वेळी व ठिकाणी मृतक याने त्याच्या प्रेयसीचे लग्न दुसऱ्या मुलासोबत जुळल्याने त्याने टेंशनमुळे विषारी औषध प्राशन केल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रकाशचंद्र बैधनाथ नागदवने, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**